**SNDT Women's University**
Centre For Distance and Online Education
Sir Vithaldas Vidyavihar, Juhu Tara Road,
Santacruz (W), Mumbai - 400 049, INDIA.

SNDT WOMEN'S UNIVERSITY Estb:1916
Re-Accredited with A+

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र
सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा मार्ग,
सांताक्रूज (प.), मुंबई-४०० ०४९, भारत.

Tel.: 91-22-2660 7758 / 2660 8193 ★ Mob.: 83696 07875 ★ E-mail : cde@sndt.ac.in ★ Website : https://sndt.ac.in/cde/

CDOE/ 24/ 2025-26/284

०५ डिसेंबर २०२५

# INVITATION FOR STUDY CENTRE RECOGNITION

**श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ ( S.N.D.T. Women's University ), दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र ( Centre for Distance and Online Education - CDOE ) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ आणि तदनंतर पुढील शैक्षणिक वर्षासाठी दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यास केंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्र सुरु करण्यासाठी पात्र शैक्षणिक संस्थाकडून आवेदन अर्ज मागणीबाबत.**

संदर्भ :

- University Grants Commission (Open and Distance Learning Programmes and Online Programmes) Regulation, 2020
- S.N.D.T. Women's University, scheme for recognized study centre

महोदय/ महोदया,

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (S.N.D.T. Women's University) संचलित दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र ( Centre for Distance and Online Education ) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ आणि तदनंतर पुढील शैक्षणिक वर्षासाठी दूरस्थ शिक्षण केंद्राचे विद्यापीठ अनुदान आयोग ( UGC - DEB ) मान्यताप्राप्त पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासकम तसेच एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मान्यता प्राप्त विविध प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी दूरस्थ शिक्षण केंद्राचे अभ्यासकेंद्र म्हणून मान्यता प्राप्त करण्यासाठी उत्सुक असलेल्या शैक्षणिक संस्थाकडून **दिनांक १५ जानेवारी २०२६** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील विविध तालुके व जिल्ह्यांच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन, सहकार्य, तसेच दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांशी निगडीत विविध उपक्रम, अध्ययन व अध्यापनाच्या प्रक्रिया राबविण्यासाठी अभ्यास केंद्रांना मान्यता दिली जाणार आहे. सदर अभ्यासकेंद्राच्या मान्यतेची प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वर्ष २०२० च्या नियमानुसार { Centre University Grant Commission ( Open and Distance Learning Programmes and Online Programmes ) Regulation, 2020 } तसेच एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यास केंद्राबाबत नियमावली यांना अधिनस्त राहून श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठामार्फत राबविण्यात येईल.

अभ्यास केंद्र मान्यतेसाठी इच्छुक संस्थाकडून **दिनांक १५ जानेवारी २०२६** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची पडताळणी केल्यानंतर विद्यापीठाकडून संबधित पात्र शैक्षणिक संस्थाना अभ्यासकेंद्र म्हणून मान्यता देण्यात येईल. अभ्यास केंद्र म्हणून मान्यतेसाठी इच्छुक संस्थांनी पुढील अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १. | महाविद्यालयाची आवश्यक शासन मान्यता |
| २. | महाविद्यालयाचे विद्यापीठ संलग्नता पत्र |
| ३. | महाविद्यालयांच्या संस्थेचे/ ट्रस्टचे नोंदणी पत्र |
| ४. | अभ्यास केंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्र सुरु करण्याबाबतचा संस्थेचा/ ट्रस्टचा ठराव |
| ५. | महाविद्यालयातील शिक्षकांची यादी |
| ६. | दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सर्व नियम मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र |
| ७. | प्रवेश शुल्क रुपये ५००/- मात्र |
| ८. | अनामत रक्कम रुपये १००००/- |

अभ्यासकेंद्र मान्यतेसाठी आवेदन अर्ज भरतांना काही शंका अथवा समस्या असल्यास ०२२-२६६६०८८५८ / मोबाईल क्र- ८३६९६०७५७८/ ७२०८८०५४६० या क्रमांकावर अथवा cde@sndt.ac.in या इमेल आयडी वर संपर्क साधावा.

( डॉ. मंगेश कदम )

**संचालक**